वि.दि.दावा क्र २१/२०२१

लक्ष्मीबाई व ईतर वि शासन

नि क्र १०८ वरील आदेश

सदरचा अर्ज प्रतिवादी ३,४,६ ते ९ यांनी दिला असून त्यांच्या कथनाप्रमाणे प्रतिवादी ३ हे ९५ वर्षांचे असून न्यायालयात येण्याची त्यांची परिस्थीती नाही. ते आजारी आहेत. दिनांक ३०/०३/२०२६ रोजी प्रतिवादी क्र ६ च्या मुलाच्या लग्नाचा साखरपूडा होता त्यामुळे सगळे प्रतिवादी त्या कार्यक्रमात होते. त्यादिवशी प्रतिवादी ३ चा पुरावा बंद करण्यात आला व दिनांक ०६/०४/२०२६ रोजी प्रतिवादी ४,६ ते ९यांनी पुरावा न दिल्याने त्यांचा पुरावा बंद केला. तो आदेश रदद होवून मिळावा म्हणून या अर्जाने विनंती केली आहे.

२. वादीने दिलेल्या म्हणण्यानुसार प्रतिवादींना योग्य ती आवश्यक आणि पुरेशी संधी देवून त्यांनी पुरावा न दिल्याने त्यांच्याविरुध्द आदेश झाले आहेत. अर्जातील कारण पुराव्यासोबत साबीत केले नाही. त्यामुळे अर्ज रददबातल व्हावा.

३. युक्तीवाद ऐकला.

४. प्रतिवादी ४, ६ ते ९ यांना दिनांक २३/०२/२०२६, १६/०३/२०२६, २७/०३/२०२६ व ३०/०३/२०२६ या तारखांना संधी देवूनही त्यांनी पुरावा न दिल्याने त्यांच्याविरुध्द आदेश झाला होता. प्रतिवादींना त्यांचे कथन शाबीत करण्यासाठी शेवटची संधी म्हणून नैसर्गीक न्यायाच्या दृष्टीने हा अर्ज मंजूर करण्यात येतो मात्र त्यासाठी खर्च म्हणून रुपये ६००/- अर्जातील प्रतिवादींनी वादीस दयावेत. तसेच निशाणी १०६ वर दाखल केलेल्या साक्षीदारांची शपथपत्रे प्रतिवादी यांनी पुढील तारखेस सादर करावीत. तशी ती सादर न केल्यास आजरोजी दाखल केलेल्या सदाशीव घुगे याच्या साक्षीशिवाय अन्य साक्षीदारांची साक्ष घेण्यात येणार नाही.

स्वक्षरीत/-

(एस.एन.सरडे)

दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,

दिनांक १०/०४/२०२६ अहमदपूर.